**<u>कंत्राटदार नोंदणीचे सुधारित नियम</u>**

**(रु.१.५० कोटी पर्यंतच्या कामांकरीता एकच कंत्राटदार वर्ग ठेवून रु. १.५० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामांकरीता कंत्राटदार नोंदणी रद्द करण्याबाबत.)**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : सीएटी -१०९६/प्र.क्र.१७२/इमा-२ ( संकीर्ण- २०१७/प्र.क्र.९४/इमारती-२)**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २१ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u>:- १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्र.सीएटी-१०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२, दि.२०/०४/१९९८
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमारती-२, दि.१२/०४/२०१७ व दि.२९/६/२०१७ चे शुध्दीपत्रक.
३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२, दि.१६ ऑगस्ट, २०१७

**<u>शुध्दीपत्रक</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक सीएटी-१०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२, (संकीर्ण-२०१७/प्र.क्र.९४/इमा-२) दि.१६/८/२०१७ अन्वये कंत्राटदारांच्या नोंदणीबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

१) सार्वजनिक बांधकाम विभागातील नोंदणी इतर विभागातही ग्राहय असल्याने संबंधित विभागास त्यांचेकडे कंत्राटदार नोंदणी प्रक्रिया दि. २१.८.२०१७ पर्यंत कार्यान्वित ठेवावी.

२) सद्यस्थितीत कंत्राटदारांची नोंदणी online असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध जिल्हा नोंदणी समितीकडे दि. २१.८.२०१७ पर्यंत प्राप्त कंत्राटदार नोंदणी प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात यावी.

३) दिनांक २१.८.२०१७ नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची सर्व (वर्ग ३, २, १क, १ब व १अ) वर्गांची कंत्राटदारांची नोंदणी संपुष्टात येईल.

४) तद्नंतर कंत्राटदारांचे ( रु. १.५० कोटी किंमतीपर्यंत ) नोंदणीकृत व अनोंदणीकृत असे २ प्रकार अस्तित्वात असतील.

५) रुपये १.५० कोटी पर्यंतची नोंदणीकृत कंत्राटदार असणे अनिवार्य असल्याने रुपये १.५० कोटी चा एकच वर्ग अस्तित्वात राहील.

नोंदणी प्रक्रिया कंत्राटदराचे Solvency Certificate, मागील ३ वर्षातील पूर्ण केलेली कामे, चालू असलेली कामे, इतर आवश्यक शासकीय नोंदणीकरणे जसे Income Tax Clearance, GST इत्यादी माहितीसह On Line फी भरल्यानंतर नोंदणी प्रक्रिया करुन ( Cashless/Faceless तसेच without Human interference Self-registration system ) सदर नोंदणी प्रमाणपत्र On Line उपलब्ध करेल.

६) आज वैध असलेले सर्व वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र त्यांच्या अंतिम वैध तारखेपर्यंत वैध असतील. तद्‌नंतर ते आपोआप व्यपगत होतील.

७) सदर बाब शासनाच्या Online Registration च्या वेबसाईटवर ITCC, नागपूर यांनी प्रसिध्द करावी. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रु.१.५० कोटी पर्यंत एकच कंत्राटदार नोंदणी वर्ग प्रक्रिया (Cashless/Faceless तसेच without Human interference Self-registration system) तयार करुन शासन मान्यता प्राप्त करण्याबाबत कार्यवाही करावी.

**याऐवजी**

**उपरोक्त मुद्दा क्र.२, ३, ४ व ५ च्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागात रु.१.५० कोटी पर्यंतच्या रकमेच्या कामांसाठी नोंदणीकृत कंत्राटदारांची आवश्यकता असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रु. १.५० कोटी पर्यंतची कंत्राटदार नोंदणी पध्दत यापूवी प्रमाणेच कार्यान्वित ठेवण्यात येत आहे. या व्यतिरिक्त इतर बाबी कायम राहतील, असे वाचावे.**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२११६०१३३३८१८ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Sachin M Chivate

Digitally signed by Sachin M Chivate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=P W D, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6e7b26851b8dfa36d6a3064f810d85d8a147243 6e83e5056505816231cebe9fa, cn=Sachin M Chivate
Date: 2017.09.21 15:51:24 +05'30'

**(सचिन चिवटे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री ( सार्वजनिक बांधकाम ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
६. महालेखापाल, १ मुंबई/२ नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/नागपूर

**प्रत-**

महासंचालक, माहिती व प्रसिद्धी महासंचालनालय, मुंबई यांना प्रसिद्धीसाठी
प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

१. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (विद्युतसह)
२. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,

३. संचालक, उद्याने व उपवने, मुंबई,
४. सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत/यांत्रिकी)
५. अधीक्षक अभियंता यांनी आपल्या अधिनस्त विभागातील कार्यालयांना सदर शासन निर्णयाची प्रत अग्रेषित करावी.
६. मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई,
७. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई कार्यासन इमारती-२ (निवड नस्ती)